राज्यसेवा मुख्य परीक्षा - २०१२

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

2012 Code : ZOO

**A**

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन – I

**एकूण प्रश्न : 150**
**एकूण गुण : 150**

**वेळ : 2 (दोन) तास**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **150** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे, त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे**. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. महाराष्ट्रात पौराणिक नाटकाचा प्रयोग कोणी सुरू केला ?

(1) राम जोशी (2) विष्णुदास भावे
(3) परशराम देव (4) गोपाल देव

Who started enacting the mythological plays in Maharashtra ?

(1) Ram Joshi (2) Vishnudas Bhave
(3) Parashram Dev (4) Gopal Dev

---

2. परमहंस सभा महाराष्ट्रात स्थापन झाली होती. तिच्याबाबत काय खरे ***नाही*** ?

(1) सर्व माणसात कोणताही भेदभाव असता कामा नये असे ती मानावयाची.
(2) ही एक गुप्त संस्था होती.
(3) ख्रिश्चन समाजाचा तिच्यावर प्रभाव नव्हता.
(4) सभासदांची नांवे फुटल्याबरोबर ती बरखास्त झाली.

Paramhans Sabha was established in Maharashtra. What is ***not*** true of it ?

(1) It believed in equality of all.
(2) It was a secret organisation.
(3) Christians had no influence on the organisation.
(4) It was disbanded when the names of the members got disclosed.

---

3. कॉर्नवालिसने प्रत्येक जिल्ह्याचे आकारानुसार लहान विभाग करुन प्रत्येक विभागावर कोणते हिंदुस्थानी अधिकारी नेमले ?

(1) मुलकी पाटील (2) दरोगा
(3) जिल्हाधिकारी (4) तलाठी

Cornwallis divided each district into small divisions and appointed Hindustani __________ on each division.

(1) Mulki Patil (2) Daroga
(3) Zilhadhikari (4) Talathi

---

4. सत्यशोधक चळवळीची वैशिष्ट्ये काय होती ?

अ. परिवर्तनवादी चळवळ ब. वर्गीय चळवळ
क. कृतीशील चळवळ ड. क्रांतीवादी चळवळ

(1) अ फक्त (2) ब आणि क
(3) अ, ब आणि क (4) ड फक्त

What was/were the main feature/features of the Satyashodhak movement ?

a. Movement of transformation b. Movement based on caste
c. Active movement d. Revolutionary movement

(1) Only a (2) b and c
(3) a, b and c (4) Only d

---

5. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा भारतीय भाषा वृत्तपत्र कायदा (1878) कोणी मंजुर केला ?
(1) लॉर्ड रिपन (2) लॉर्ड लिटन (3) लॉर्ड कर्झन (4) लॉर्ड डफरीन

Who passed the Indian Language Newspaper Act (1878) curbing the independence of the newspapers ?
(1) Lord Ripon (2) Lord Lytton (3) Lord Curzon (4) Lord Dufferin

6. ई.स. 1800 मध्ये कोणी हिंदी लोकांसाठी कलकत्ता येथे फोर्ट विलीयम महाविद्यालयाची स्थापना केली ?
(1) लॉर्ड मेकॉले (2) लॉर्ड बेंटिंक
(3) लॉर्ड वेलस्ली (4) लॉर्ड डलहौसी

Who established the Fort William College in Calcutta for the Indian people in the year 1800 ?
(1) Lord Macaulay (2) Lord Bentinck
(3) Lord Wellesley (4) Lord Dalhousie

7. सन् 1947 मध्ये भारत स्वतंत्र झाला तेव्हा दिल्ली रेडीओ वरून ''वंदे मातरम्'' हे राष्ट्रगीत गाण्याचा मान कोणाला देण्यात आला ?
(1) अंजनीबाई मालपेकर (2) हिराबाई बडोदेकर
(3) योगुबाई कर्डीकर (4) लता मंगेशकर

Who was given the honour of singing the national song “Vande Mataram” from Delhi Radio when India became independent in 1947 ?
(1) Anjanibai Malpekar (2) Hirabai Badodekar
(3) Yogubai Kardikar (4) Lata Mangeshkar

8. ICS प्राप्त करुन देखील सुभाष चंद्र बोस यांनी त्या नोकरीकडे का पाठ फिरविली ?
(1) त्यांना स्वातंत्र्य आंदोलनात उडी घ्यायची होती.
(2) ब्रिटीशांची नोकरी करणे त्यांना आवडले नाही.
(3) त्यांना इंग्लंडच्या राजसिंहासनाशी एकनिष्ठतेची शपथ घेण्यास सांगितले गेले.
(4) त्यांना इंग्रजांची सत्ता मान्य नव्हती.

Why is it that Subhash Chandra Bose did not join ICS even after getting selected ?
(1) He wanted to participate in freedom movement.
(2) He did not like to join British services.
(3) He was asked to be faithful to the British Empire under oath.
(4) He did not want to work under British power.

**9.** ब्रिटीश सरकारने जमीन महसूल पद्धतीत कोणते बदल केले ?

अ. ब्रिटीशांनी जमिनीची मोजणी करुन जमीन महसूल निश्चित केला.

ब. ब्रिटीशांनी शेतकऱ्यांना जमीन महसूल रोखीने भरणे सक्तीचे केले.

क. वेळेत जमीन महसूल न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा कायदा केला.

ड. सर्व शेतकऱ्यांनी जमीन महसूल वेळेत भरणे आवश्यक केले.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) अ आणि ब फक्त (2) ब आणि क फक्त (3) अ आणि क फक्त (4) वरील सर्व

Which changes were made by the British Government in the land revenue system ?

a. Government measured the land and fixed the land revenue.

b. British Government made it compulsory for the peasants to pay land revenue in cash.

c. They made a rule that failure to pay revenue in time would result in the land being confiscated.

d. They made the peasants pay the revenue timely.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a and b only (2) b and c only (3) a and c only (4) All the above

---

**10.** 26 जुलै, 1862 ला इंग्लंडच्या राणीने दिलेल्या परवानगीनुसार देशात खालीलपैकी कोणते उच्च न्यायालय सुरू झाले ***नाही*** ?

(1) मुंबई (2) अलाहाबाद (3) कोलकत्ता (4) मद्रास

Which of the High Courts in India was ***not*** mandated under the mandate of the British Queen on $26^{th}$ July, 1862 ?

(1) Mumbai (2) Allahabad (3) Kolkata (4) Madras

---

**11.** गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिंकने कोणत्या सुधारणा केल्या ?

अ. राज्यकारभारातील अनावश्यक पदे रद्द केली.

ब. कंपनीच्या नोकरांचे पगार कमी करण्यात आले.

क. भत्ता देणे बंद करण्यात आले.

ड. भारताला स्वातंत्र्य देण्याचे घोषित केले.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) अ, ब आणि क (2) अ आणि ड फक्त

(3) अ, ब आणि ड (4) वरील सर्व

Which reforms were made by the Governor General William Bentinck ?

a. The unnecessary posts in the administration were done away with.

b. Reduced the payments of Company servants.

c. Allowances were stopped.

d. Announced to give freedom to India.

Which of the statements given above are correct ?

(1) a, b and c (2) a and d only

(3) a, b and d (4) All the above

12. लॉर्ड डलहौसीने लष्कराच्या विकेंद्रीकरणासाठी कोणत्या सुधारणा केल्या ? त्याबाबत खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) बंगालमधील सैन्य मेरठ येथे नेले.

(2) कलकत्ता येथे असलेली युद्ध सामग्री मेरठ येथे नेली.

(3) सिमला येथे भारताचे प्रमुख केंद्र उभारले.

(4) भारतीय लष्करावर विश्वास ठेवला.

Which reforms were made by Lord Dalhousie for de-centralization of Army ? Which of the following statements is ***incorrect*** in this respect ?

(1) Bengal Army was shifted to Meerut.

(2) The war weapons were brought from Calcutta to Meerut.

(3) Established main centre at Shimla.

(4) He trusted the Indian Army.

---

13. ब्रिटनची महाराणी व्हिक्टोरिया हिने 1 नोव्हे 1858 मध्ये जाहीर केलेल्या जाहिरनाम्यात खालीलपैकी कोणत्या तरतुदीचा समावेश ***नव्हता*** ?

अ. भारतीयांना जात, वर्ण व धर्माचा विचार न करता सरकारी नोकरी देणे.

ब. भारतीयांना आर्थिक स्वातंत्र्य व समानता याची हमी देण्यात आली.

क. कायद्याच्या अंमलबजावणीत जनतेच्या भावनांचा विचार करण्यात येईल.

ड. कायदे मंडळात भारतीय प्रतिनिधींचा 75% वाटा असेल.

योग्य पर्याय निवडा :

(1) अ, ब आणि ड (2) अ, क आणि ड

(3) ब आणि क (4) फक्त ड

Queen Victoria made a proclamation on November 1, 1858. Which of the following provisions were ***not*** included in the proclamation ?

a. Provide Government service without considering caste, creed and religion to Indians.

b. Gave assurance of religious freedom and equality.

c. Will and emotions of the people should be respected while implementing legislation.

d. There would be 75% representation for the Indians in the legislature.

Choose the correct option :

(1) a, b and d (2) a, c and d

(3) b and c (4) Only d

---

**14.** ब्रिटीशांच्या अर्थनीतीमुळे शेतीवरील ताण कसा वाढला ?

अ. भारतीय कुटिरोद्योगातून लक्षावधी कारागीर बेकार झाले.
ब. शेतीतून आवश्यक तेवढे उत्पादन होत नव्हते.
क. शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नव्हते.
ड. शेतकऱ्यांना आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करणे अशक्य झाले.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ फक्त (4) ड फक्त

How did the British economic policy increase the strain on Indian agriculture ?

a. Skilled artisans were thrown out of the small scale industry.
b. Agricultural production was not sufficient.
c. Agriculture was not profitable for the peasants.
d. It was not possible for the agriculturists to take care of their families.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a and b (2) b and c (3) a only (4) d only

---

**15.** इंग्रजी राजवट ही एक प्रकारे वरदान आहे असे मवाळवादी नेत्यांना का वाटू लागले ?

(1) प्रांता-प्रांतांमध्ये व अनेक संस्थानांमध्ये विभागल्या गेलेला देश ब्रिटीशांनी एक केला.
(2) ब्रिटीशांनी भारतात अनेक सुधारणा केल्या.
(3) ब्रिटीशांनी शेती व्यवसायात प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न केला.
(4) इंग्रजांनी भारतात औद्योगिक प्रगती साध्य केली.

Why did the Moderates feel that the British rule was a gift for the Indian people ?

(1) British Government had unified the Princely States.
(2) British Government undertook various reforms in India.
(3) British Government tried to develop agricultural sector.
(4) British Government developed the industrial sector in India.

---

**16.** योग्य पर्याय निवडून खालील विधान पूर्ण करा :

धोंडो केशव कर्वे यांनी ''निष्काम कर्ममठ ही संस्था'' स्थापन केली, कारण त्यांना __________ .

(1) स्त्रियांचा उद्धार करावयाचा होता
(2) समाजाची प्रमाणिकपणे सेवा करावयाची होती
(3) समाजसेवक निर्माण करावयाचे होते
(4) स्वार्थी दृष्टिकोण न ठेवता समाजाची सेवा करावयाची होती

Complete the following sentence by choosing the appropriate option from those given below :

Dhondo Keshav Karve started "Nishkam Karmamath Institution" because he wanted to __________ .

(1) provide upliftment for women
(2) serve the society honestly
(3) develop and promote social workers
(4) serve the society without any selfish motive

---

**17.** योग्य पर्यायाने विधान पूर्ण करा :

सन 1901 मध्ये कलकत्यात स्थापन झालेली 'अनुशीलन समिती' __________ साठी प्रसिद्ध होती.

(1) आरोग्य शिक्षण (2) व्यावसायिक शिक्षण

(3) शारिरीक शिक्षण (4) औद्योगिक शिक्षण

Complete the sentence with the correct option :

'Anushilan Samiti', established at Calcutta in 1901, was known for __________ .

(1) Medical Education (2) Vocational Education

(3) Physical Education (4) Industrial Education

---

**18.** रणजितसिंहाला लाहोरवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यास झमानशाहने संमती का दिली ?

(1) झमानशाह रणजितसिंहाचा मित्र होता

(2) झमानशाहने रणजितसिंहाला लाहोर बक्षीस दिले

(3) रणजितसिंहाने तोफा झमानशाहकडे पाठविल्या होत्या म्हणून

(4) रणजितसिंह झमानशाहच्या मर्जीतील होता

Why did Zaman Shah permit Ranjit Singh to establish power on Lahore ?

(1) Zaman Shah was a friend of Ranjit Singh

(2) Zaman Shah had gifted Lahore to Ranjit Singh

(3) Ranjit Singh had given cannons to Zaman Shah

(4) Ranjit Singh was in favour of Zaman Shah

---

**19.** खालील विधानांचा विचार करा :

*विधान (A) :* मादाम भिकाजी कामा यांना भारतीय महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत काम करावे असे वाटे.

*कारण (R) :* भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर स्त्रियांना मतदानाचा अधिकार व इतरही अधिकार मिळतील.

आता सांगा कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) A बरोबर आहे, R बरोबर आहे (2) A चुकीचे आहे, R ही चुकीचे आहे

(3) A चुकीचे आहे, R बरोबर आहे (4) A बरोबर आहे, R चुकीचे आहे

Consider the following statements :

*Assertion (A) :* Madam Bhikaji Cama wanted Indian women to work for freedom.

*Reason (R) :* When India gets independent women would get Right to Vote along with other rights.

Now state whether

(1) A is true, R is true (2) A is false, R is false

(3) A is false, R is true (4) A is true, R is false

---

**20.** मीर जाफर यास नवाब पदावरुन दूर करण्याचे लॉर्ड क्लाईव्हने का ठरविले ?

(1) लॉर्ड क्लाईव्हच्या मागण्या त्याने पूर्ण केल्या नाहीत

(2) कंपनीने केलेनी पैशाची मागणी तो पूर्ण करु शकला नाही

(3) तो लॉर्ड क्लाईव्हचे ऐकत नव्हता

(4) तो राज्यकारभार योग्य पद्धतीने चालवीत नव्हता

---

Why did Lord Clive decide to remove Mir Jafar ?
(1) He did not comply with the demands of Lord Clive
(2) He could not fulfil the Company's demand for money
(3) He did not obey Lord Clive
(4) He misruled his state

**21.** सन 1988 पासून ज्योतिबा फुले हे 'महात्मा' म्हणून का ओळखले जावू लागले ?
(1) त्यांनी जनतेच्या हितासाठी कार्य केले
(2) त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वाचे योगदान दिले
(3) त्यांनी कनिष्ठ जमातींसाठी अव्याहतपणे कार्य केले
(4) त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावली
Why was Jyotiba Phule known as a 'Mahatma' since 1988 ?
(1) He worked for the common people
(2) He contributed most in the Freedom movement
(3) He worked day and night for the lower caste people
(4) He contributed in the field of education

**22.** ब्रिटीशांनी भारतीय शेतकऱ्यांवर नगदी पिकांचे उत्पादन घेण्याची सक्ती करण्याचा प्रयत्न का केला ?
(1) भारतीय लोकांचा आर्थिक फायदा व्हावा
(2) भारतीय प्रगतीत हातभार लागावा
(3) ब्रिटीशांना याद्वारे प्रचंड नफा होणार होता
(4) शेतकऱ्यांना फार मोठा नफा मिळणार होता
Why was growing of cash crops made mandatory for the Indian farmers by the British Government ?
(1) For economic benefit to the Indian people
(2) For development of India
(3) For the benefit of British Government
(4) For betterment of the farmers

**23.** ब्रिटीशांनी भारताच्या औद्योगिक विकासात अडथळे का आणले ?
(1) ब्रिटीशांना फक्त स्वतःचा फायदा साध्य करावयाचा होता
(2) भारतीयांना औद्योगिक विकास म्हणजे काय हे माहित नव्हते
(3) भारतीय मोठ्या प्रमाणावर शिकलेले नसल्याने ते औद्योगिक प्रगती करू शकणार नाहीत असे ब्रिटीशांना वाटत होते
(4) भारतीय औद्योगिक विकासा बाबत उत्सुक नव्हते
Why was the British Government against the industrial development in India ?
(1) British Government wanted to protect its own interests
(2) Indian people were not aware of the industrial development
(3) British thought that industrial development in India was not feasible as most of the Indian people were illiterate
(4) Indian people did not desire industrial development

**24.** ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या धर्मांतर प्रक्रियेविरुद्ध सर्वप्रथम आवाज कोणी उठवला ?

(1) बाळशास्त्री जांभेकर (2) विष्णुशास्त्री चिपळुणकर

(3) महात्मा फुले (4) विष्णु बुवा ब्रम्हचारी

Who first raised his voice against the religious conversion started by the Christian missionaries ?

(1) Balshastri Jambhekar (2) Vishnushastri Chiplunkar

(3) Mahatma Phule (4) Vishnu Buva Brahmachari

---

**25.** ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखाली भारतातील पारंपारिक उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला कारण

अ. भारतीय कामगाराकडे आवश्यक ते तांत्रिक प्राविण्य नव्हते

ब. भारतीयांनी शेतीवर लक्ष केंद्रित केले होते

क. भारतीय माल ब्रिटिश मालाशी स्पर्धा करू शकला नाही

ड. वरीलपैकी कोणतेही नाही

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क

(3) अ आणि ब (4) फक्त क

India's traditional industrial business got ruined under the East India Company because

a. The Indian workers did not have the required technical skill

b. Indians concentrated on Agriculture

c. Indian products could not compete with the British products

d. None of the above

Which of the statements given above is/are correct ?

(1) a, b and c (2) b and c

(3) a and b (4) Only c

---

**26.** एलफिन्स्टनला जमीन महसुलाच्या संदर्भात महाराष्ट्रात कोणती पद्धत लागू करावयावी होती ?

(1) कायमधारा पद्धत (2) रयतवारी पद्धत

(3) महालवारी पद्धत (4) मौजेवारी पद्धत

Which system did Elphinstone want to impose in terms of land revenue ?

(1) Kayamdhara system (2) Rayatwari system

(3) Mahalwari system (4) Maujewari system

---

**27.** चंद्रनगरचा प्रशासक या नात्याने ______ याने आपल्या दूरदृष्टीचा व प्रशासकीय कौशल्याचा परिचय दिला.

(1) वेरेल्स्ट (2) लॉरेन्स (3) सॉण्डर्स (4) डुप्ले

__________ as an administrator of Chandranagar exhibited a great vision and administrative skill.

(1) Verelest (2) Lawrence (3) Saunders (4) Dupleix

---

**28.** ब्राह्मणेतर चळवळींचा हेतू काय होता ?

अ. समाजातील ब्राम्हणांच्या वर्चस्वाला विरोध न करणे.

ब. कनिष्ठ जातींच्या लोकांना सन्मानाचे स्थान देणे.

क. बहुजन समाजाचे राजकीय संघटन घडवून आणणे.

ड. ब्राम्हणेतरांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात स्थान मिळावे.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) अ आणि ब (2) ब आणि क

(3) ब, क आणि ड (4) ड फक्त

What was the objective of the non-Brahmin movements ?

a. Not to oppose the superiority of Brahmins in the society.

b. To give respect to the lower-caste people.

c. To unite Bahujan Samaj politically.

d. To see that the non-Brahmins are respected in social, economic and educational spheres.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a and b (2) b and c

(3) b, c and d (4) Only d

---

**29.** धार्मिक शुद्धी आणि बंगाली मुस्लीम समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी हाजी शरीयत उल्लाह यांनी कोणती चळवळ सुरू केली ?

(1) वहाबी चळवळ (2) टिटू-मीर चळवळ

(3) फरियादी चळवळ (4) देवबंद चळवळ

Which movement was started by Haji Shariyat Ullah to oppose the oppressive traditions of Bengali and Muslim Societies ?

(1) Wahabi Movement (2) Titu-Mir Movement

(3) Fariyadi Movement (4) Devaband Movement

---

**30.** शासकीय कर्मचाऱ्यांवर राष्ट्रीय कांग्रेसशी संबंध ठेवण्यास कोणी बंदी घातली ?

(1) लॉर्ड कर्झन (2) लॉर्ड डफरिन

(3) लॉर्ड रिपन (4) ए.ओ. ह्यूम

Who prohibited the government employees from keeping relations with the National Congress (Rashtriya Sabha) ?

(1) Lord Curzon (2) Lord Dufferin

(3) Lord Ripon (4) A.O. Hume

---

**31.** खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ते ओळखा.

(1) ऑगस्ट 1947 ते सप्टेंबर 1948 हया दरम्यान साम्यवादी पक्षांनी निझाम विरोधी चळवळीत भाग घेतला.

(2) त्यांनी शेतकऱ्याचे गनिमी काव्याने लढण्याचे पथक तयार केले व रझाकारांवर हल्ला केला.

(3) त्यांनी भारतीय लष्कराला पूर्ण पाठिंबा दिला.

(4) 1951 मध्ये साम्यवादी पक्षाने ही चळवळ मागे घेतली.

Find the ***incorrect*** statement.

(1) Communists participated in anti-Nizam movement between August 1947 and September 1948.

(2) They organised peasant guerilla warfare to attack Razakars.

(3) They gave full cooperation to Indian army.

(4) This Communist movement was withdrawn in 1951.

---

**32.** खालील विधान 'अ' आणि रीझन् 'र' वाचा :

*विधान 'अ' :* नेहरू युगात भारत व अमेरिकेचे (यु.एस.अे.) संबंध सलोख्याचे नव्हते.

*रीझन् 'र' :* अमेरिकेला साम्यवादाचा तिटकारा होता, तर नेहरूंवर मार्क्सवादाचा प्रभाव होता.

योग्य पर्याय निवडा :

(1) 'अ' असत्य असून 'र' सत्य आहे.

(2) 'अ' सत्य असून 'र' असत्य आहे.

(3) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असून 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देते.

(4) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असली तरी 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देत नाही.

Read the following statements Assertion 'A' and Reason 'R' :

*Assertion 'A' :* Relations between India and U.S.A. were strained during Nehru era.

*Reason 'R' :* U.S.A. hated Communism and Nehru was influenced by Marxism.

Choose the correct option :

(1) 'A' is false and 'R' is true.

(2) 'A' is true and 'R' is false.

(3) Both 'A' and 'R' are true and 'R' is the correct explanation of 'A'.

(4) Both 'A' and 'R' are true but 'R' is not the correct explanation of 'A'.

---

**33.** नक्षलवादी चळवळीच्या उभारणीच्या काळात बहुसंख्य सभासद कोण होते ?

(1) वाढत्या महागाईने ग्रासलेले बेकार

(2) उद्योगांना उत्तेजन न मिळाल्यामुळे निराश झालेले कामगार

(3) नैसर्गिक आपत्तींच्या विळख्यात सापडलेले शेतकरी

(4) तत्कालीन राजकारणामुळे भडकलेले विद्यार्थी

Who were majority of the members of the Naxalite movement when it was being organized ?

(1) The unhappy unemployed affected by the price rise

(2) Despondent workers, because there was no encouragement to industries

(3) The farmers, who were caught in natural calamities

(4) Students, who were restless due to the then existing politics

---

**34.** स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी गोपाळ गणेश आगरकर यांचे काय मत होते ?

(1) मुलींनी केवळ लिहिणे व मोजणे शिकावे

(2) मुलींनी फक्त प्रादेशिक भाषा व गृहशास्त्र शिकावे

(3) मुलींनी मॅट्रीक च्या परिक्षेस आवश्यक असलेले सर्व विषय शिकावेत

(4) वरीलपैकी एकही नाही

What were the views of Gopal Ganesh Agarkar about women's education ?

(1) Girls should learn writing and counting only

(2) Girls should be taught regional language and home science only

(3) Girls should learn all subjects necessary to appear for matriculation

(4) None of the above

---

**35.** 'मूकनायक' ची सुरूवात झाली तेव्हा खालीलपैकी कोणता गट त्याच्याशी संबंधित होता ?

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील

(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर

(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पांडूरंग भाटकर, ज्ञानदेव घोलप

(4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पांडूरंग भाटकर, दिनकरराव जवळकर

Who among the following were associated with 'Mooknayak' when it was started ?

(1) Dr. Babasaheb Ambedkar, Mahatma Jotiba Phule, Karmaveer Bhaurao Patil

(2) Dr. Babasaheb Ambedkar, Keshavrao Jedhe, Dinkarrao Javalkar

(3) Dr. Babasaheb Ambedkar, Pandurang Bhatkar, Gyandev Gholap

(4) Dr. Babasaheb Ambedkar, Pandurang Bhatkar, Dinkarrao Javalkar

---

**36.** "जर मी परकीय सत्तेची सेवा चांगली करीत होतो तर माझ्या देशाची किती जास्त चांगली सेवा करु शकेन ?" असे एक मोठे I.C.S. अधिकारी म्हणाले. हे अधिकारी कोण होते ?

(1) अटल बिहारी बाजपाई (2) चिं.द्वा. देशमुख

(3) उमाशंकर बाजपाई (4) वरीलपैकी कोणीही नाही

"If I could serve so well a foreign power, how much better will I serve my own country ?" said an outstanding I.C.S. officer. Who was this officer ?

(1) Atal Bihari Vajpayee (2) C.D. Deshmukh

(3) Umashankar Bajpai (4) None of the above

37. __________ येथील सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात "कामगार व शेतकरी हे राष्ट्रीय सभेचे हात व पाय आहेत" अशा घोषणा दिल्याजात असत.

(1) चेन्नई (2) मुंबई (3) कोलकाता (4) दिल्ली

__________, the Congress slogan during the Civil Disobedience Movement was that the "Workers and peasants are the hands and the feet of the Congress."

(1) In Chennai (2) In Mumbai (3) In Kolkata (4) In Delhi

---

38. 1956 च्या राज्यपुनर्रचना कायद्यानुसार सर्वप्रथम __________ भाषिकप्रदेश आंध्रप्रदेशास जोडण्यात आला.

(1) कन्नड (2) मराठी

(3) तमिल (4) वरीलपैकी कोणताही नाही

First of all, by the Act of Reorganisation of States of 1956, __________ speaking parts of Hyderabad were merged with Andhra Pradesh.

(1) Kannada (2) Marathi

(3) Tamil (4) None of the above

---

39. खालीलपैकी कोणता राजकीय पक्ष संयुक्त महाराष्ट्र समितीत सहभागी झाला ***नाही*** ?

(1) हिंदु महासभा

(2) शेडयुल्ड कास्टस् फेडरेशन

(3) महाराष्ट्रातील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

(4) जनसंघ

Which one of the following political parties did ***not*** participate in Samyukta Maharashtra Committee ?

(1) Hindu Mahasabha

(2) Scheduled Castes Federation

(3) Indian National Congress in Maharashtra

(4) Jan Sangh

---

40. "रक्त सांडून आणि अतीशय कष्टाने साध्य कलेले संघराज्य नष्ट करणारा एकाकी भू भाग, भारत कदापी मान्य करणार नाही." असे सरदार वल्लभभाई पटेल कोणाला म्हणाले ?

(1) जम्मू-काश्मिरच्या राज्य-कर्त्याला (2) जुनागडच्या राज्य-कर्त्याला

(3) हैदराबादच्या राज्य-कर्त्याला (4) सातारच्या राज्य-कर्त्याला

"India would not tolerate an isolated spot which would destroy the Union, which we have built up with blood and toil." To whom did Sardar Vallabhbhai Patel say this ?

(1) Ruler of Jammu-Kashmir (2) Ruler of Junagad

(3) Ruler of Hyderabad (4) Ruler of Satara

41. "स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" हे घोषवाक्य कोणाशी संबंधित आहे ?
(1) खानदेश एज्युकेशन सोसायटी (2) रयत शिक्षण संस्था
(3) मराठा विद्याप्रसारक मंडळ (4) गोखले एज्युकेशन सोसायटी

Which organisation proclaimed "Education through self-help is our motto" ?
(1) Khandesh Education Society (2) Rayat Shikshan Sanstha
(3) Maratha Vidya Prasarak Mandal (4) Gokhale Education Society

42. जोडया जुळवा :
अ. संयुक्त महाराष्ट्र परिषद अध्यक्ष I. सं.का. पाटील
ब. बॉम्बे सिटीझन कमिटी मुख्य II. एन.व्ही. गाडगीळ
क. खासदार मुंबई III. शंकरराव देव
ड. खासदार पुणे IV. पुरषोत्तमदास ठाकुरदास

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | IV | III | II | I |

Match the following :
a. President Samyukta Maharashtra Parishad I. S.K. Patil
b. Head, Bombay Citizen's Committee II. N.V. Gadgil
c. M.P. from Mumbai III. Shankarrao Deo
d. M.P. from Pune IV. Purshottamdas Thakurdas

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | IV | III | II | I |

43. 1920 मध्ये महात्मांनी दिलेल्या हाकेला प्रतीसाद देऊन राष्ट्रीय चळवळीत कोणत्या टोळ्या सहभागी झाल्या ?
(1) संताळ, ओरान, भिल्ल आणि गोंड
(2) संताळ, वारली, काथकरी आणि भिल्ल
(3) भिल्ल, गोंड, वारली आणि संताळ
(4) भिल्ल, गोंड, संताळ आणि काथकरी

Name the tribes that responded to the call given by the Mahatma and joined the National Movement in 1920.
(1) Santals, Oraons, Bhils and Gonds
(2) Santals, Varlis, Kathkaris and Bhils
(3) Bhils, Gonds, Varlis and Santals
(4) Bhils, Gonds, Santals and Kathkaris

**44.** 19 व्या शतकातील शेतकऱ्यांची आंदोलने ब्रिटीश सरकारला फारशी धोकादायक का वाटली ***नाहीत*** ?

(1) शेतकऱ्यांनी ब्रिटीश सरकारला लक्ष्य केले नाही

(2) सावकार व जमिनदार हेच शेतकऱ्यांचे शत्रू होते

(3) शेतकऱ्यांजवळ पुरेशी शस्त्र नव्हती

(4) आंदोलनात सातत्य व भविष्यकालीन योजना नव्हती

Why were the $19^{th}$ century peasant movements ***not*** taken as threats by the British Government ?

(1) Peasants did not target the British rule

(2) The enemies of the peasants were landlords and moneylenders

(3) Peasants did not have enough weapons

(4) Movements were not continuous and there was no long-term planning

---

**45.** सन 1900 मध्ये नाशिक मध्ये स्थापन झालेल्या "मित्र मेळा" संघटने बाबत काय खरे ***नाही*** ?

(1) वि.दा. सावरकर तिचे क्रियाशील सभासद होते

(2) ती एक गुप्त संघटना होती

(3) ती मवाळांची संघटना होती

(4) तीचे नंतर रूपांतर अभिनव भारत या संस्थेत झाले

What is ***not*** true of the "Mitra Mela" organisation established in Nashik in 1900 ?

(1) V.D. Savarkar was its active member

(2) It was a secret organisation

(3) It was an organisation of the moderates

(4) Later it transformed into "Abhinav Bharat"

---

**46.** 15 ऑगस्ट 1947, या दिवशी भारत स्वतंत्र झाला तेव्हा महात्मा गांधी कोठे होते ?

(1) सत्तांतर कार्यक्रमासाठी ते जवाहरलाल नेहरू बरोबर दिल्लीत लाल किल्ल्यावर होते

(2) ते खान अब्दूल गफार खान हयांच्या बरोबर सरहदीवर होते

(3) ते पंजाब प्रांतात हिंदू-मुस्लिम दंगे रोखण्याचे प्रयत्न करित होते

(4) वरीलपैकी कोणताही पर्याय नाही

Where was Mahatma Gandhi on $15^{th}$ August 1947, when India got independence ?

(1) He was with Jawaharlal Nehru at the Red Fort Delhi, for transfer of power

(2) He was at the front with Khan Abdul Ghaffar Khan

(3) He was trying to control Hindu-Muslim riots in the Punjab province

(4) None of the above

---

**47.** जे.व्ही.पी. कमिटी ने 1948 मध्ये कोणती शिफारस केली ?

(1) भाषावार प्रांत रचना करावी

(2) भाषावार प्रांत रचना सध्यातरी करु नये

(3) हिंदी ही राष्ट्रभाषा असावी

(4) इंग्रजी ही 1967 पर्यंत राजभाषा असावी

---

What was the recommendation of the JVP Committee in 1948 ?

(1) Create linguistic states

(2) Not to create linguistic states for the time being

(3) Hindi should be a national language

(4) English should continue as official language till 1967

---

**48.** भारताने गोवा व इतर पोर्तुगीज वसाहतीवर लष्करी कार्यवाहीस का नकार दिला ?

(1) हया वसाहती लहान होत्या व भारताच्या प्रतिष्ठेला धक्का देणाऱ्या नव्हत्या

(2) त्या प्रदेशातील जनतेच्या सहकार्याबद्दल साशंकता होती

(3) सर्व देशांशी शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवायचे असे भारताचे धोरण होते

(4) पोर्तूगालच्या नाटो मित्रदेशांची भिती भारतास वाटत होती

Why did India refuse to take military action in Goa and other Portuguese colonies ?

(1) These areas were small and did not affect the prestige of India

(2) India was skeptical about cooperation of the local people

(3) India had committeed to settle disputes with all nations in a peaceful manner

(4) India was afraid of the NATO allies of Portugal

---

**49.** "जर देवाने अस्पृश्यता सहन केली, तर त्याला मी देव मानणार नाही." असे उद्गार कोणी काढले ?

(1) लोकमान्य टिळक — डिप्रेस्ड क्लासेस च्या दुसऱ्या सभेत

(2) महात्मा गांधी — वायकोम सत्याग्रहात

(3) वल्लभभाई पटेल — 1921 च्या काँग्रेस अधिवेशनात

(4) मदन मोहन मालवीय — काँग्रेस च्या अस्पृश्यता निवारण समितीत

Who said, "If a God were to tolerate untouchability, I would not recognise him as God at all" ?

(1) Lokmanya Tilak — at the second conference of depressed classes

(2) Mahatma Gandhi — at Vaikom Satyagraha

(3) Vallabhbhai Patel — at the Congress Session of 1921

(4) Madan Mohan Malviya — at the Congress Committee meeting on untouchability

---

**50.** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रार्थना समाजापासुन दूर गेले कारण त्यातील मंडळीना शिंदे यांनी केलेली ________ ही गोष्ट खटकली.

(1) डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही स्वतंत्र संस्था सुरू केली

(2) लोकमान्य टिळकांना अटक झाली तेव्हा प्रार्थना समाजात प्रार्थना सादर केली

(3) ब्राम्हो समाजाकडे कल दाखवला

(4) अस्पृशता निवारणासाठी राष्ट्रीय सभेची मदत मागितली

Maharshi Vitthal Ramji Shinde drifted from the Prarthana Samaj, when some members resented that

(1) he started an independent organisation named "Depressed Classes Mission"

(2) he offered prayers in Prarthana Samaj when Lokmanya Tilak was sentenced to jail

(3) he was inclined towards Brahmo Samaj

(4) he asked help from Indian National Congress for removal of untouchability

---

**51.** खालीलपैकी कोणती जोडी जुळत ***नाही*** ?

(1) पंडित नेहरू — अलिप्ततावादी धोरण
(2) लाल बहादूर शास्त्री — ताश्कंद करार
(3) इंदिरा गांधी — जवाहर रोजगार योजना
(4) वल्लभभाई पटेल — संस्थानांचे विलीनीकरण

Which one of the following pairs is ***not*** matched ?

(1) Pandit Nehru — Non-Alignment Policy
(2) Lal Bahadur Shastri — Tashkent Treaty
(3) Indira Gandhi — Jawahar Employment Scheme
(4) Vallabhbhai Patel — Merging Princely States

---

**52.** बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा मुख्य हेतु काय होता ?

अ. गरीब हिंदू मुलांना शिक्षण देणे.
ब. गरीब युरोपियन मुलांना शिक्षण देणे.
क. गरीब आदिवासी मुलांना शिक्षण देणे.

योग्य पर्याय निवडा :

(1) अ फक्त (2) अ आणि ब (3) अ, ब आणि क (4) फक्त ब

What was the main objective of the Bombay Education Society ?

a. To educate the poor Hindu children.
b. To educate the poor European children.
c. To educate the poor tribal children.

Select the correct option :

(1) a only (2) a and b (3) a, b and c (4) b only

---

**53.** मेरठ कटाचा भारतीय साम्यवादी पक्षावर सर्वात महत्त्वाचा कोणता परिणाम झाला ?

(1) दीर्घकाळ चाललेल्या खटल्यामुळे, पक्षाला जनतेची सहानूभूती मिळाली
(2) गांधीजी जेलमध्ये आरोपींना भेटावयास गेले
(3) हाय कमांडला स्वतःची योग्यता कळाली
(4) साम्यवाद्यांचा विद्यार्थी संघटनेत शिरकाव झाला

What was the main effect of Meerut case on the Communist Party of India ?

(1) The prolonged trial gained them public sympathy
(2) Gandhiji visited the accused in the jail
(3) High command realised its position
(4) Communists infiltrated students' organisations

---

**54.** जयप्रकाश नारायण हयांच्या 'संपूर्ण क्रांती' ची संकल्पना काय होती ?

(1) इंदिरा गांधी हयांच्या नेतृत्वा विरुद्ध चळवळ
(2) राजकिय पक्षांच्या विरोधात चळवळ कारण जयप्रकाश नारायण हयांचा पक्ष विरहित सरकार वर विश्वास होता
(3) पोलिस व लष्कर हयांच्या अधिकाराच्या गैरवापरा विरोधी संघर्ष
(4) लोकांना भ्रष्टाचाराकडे प्रवृत्त करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध लढा

What was the idea of 'Total Revolution' of Jai Prakash Narayan ?

(1) A movement against the leadership of Indira Gandhi
(2) A movement against political parties as Jai Prakash Narayan believed in partyless government
(3) Struggle against police and army excesses
(4) Struggle against the corrupt system

---

**55.** 4 नोव्हेंबर 1905 मध्ये स्थापन केलेल्या (कार्ललाईल) परिपत्रक विरोधी संस्थेचा मुख्य उद्देश कोणता होता ?
(1) परिपत्रकाला विरोध करणे
(2) काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणे
(3) विद्यार्थी आंदोलनाचे आयोजन करणे
(4) वरीलपैकी कोणताच उद्देश नव्हता

What was the chief objective of the Anti (Carlyle) Circular Society established on November 4, 1905 ?
(1) To oppose the Circular
(2) To provide education to the expelled students
(3) To organize students movements
(4) None of the above

---

**56.** खालील विधान पुढीलपैकी कोणत्या चळवळीशी निगडीत असावे ?
"युवकांचे हे पहिलेच क्रांतीकारी आंदोलन होते. जवाहरलाल नेहरू व सुभाष चंद्र बोस हयानंतर नेते म्हणुन पुढे आले. कारण त्यांनीच ठिक ठिकाणी फिरून युवकांना जागृत केले होते."
(1) धरासणा आंदोलन (2) सायमन विरोधी आंदोलन
(3) सविनय कायदेभंग (4) चले जाव आंदोलन / भारत छोडो

With which movement is the following statement associated ?
"It was the first youth organised movement having a revolutionary nature. Jawaharlal Nehru and Subhash Chandra Bose emerged as leaders, as they were the ones who went from place to place to create awareness among the youth."
(1) Dharasana movement (2) Anti Simon movement
(3) Civil Disobedience (4) Quit India movement

---

**57.** साम्यवादी व डाव्या पक्षांनी सहभाग घेतलेल्या किसान सभेत राष्ट्रीय सभेचे काही सदस्य का हजर राहिले ?
(1) बहुतेक सर्व मेरठ कटाशी संबंधीत होते व सुटकेनंतर शेतकऱ्यासाठी काम करण्याची इच्छा बाळगुन होते.
(2) ते नेहरू व गांधीजीच्या शेती विषयक धोरणाच्या बाबतीत निराश होते.
(3) ते सर्व शेतमजूरी करणारे होते व अन्याय विरोधात सामिल झाले होते.
(4) स्वतः जमीनदार असल्यामुळे शेतकरी संघटनेवर वर्चस्व ठेवण्यास हजर होते.

Why did some Congressmen remain present at the Kisan Sabhas attended by Communists and Leftists ?
(1) They were involved in Meerut conspiracy and after release wished to do something for the farmers.
(2) They were upset with the agricultural policies of Nehru and Gandhiji.
(3) They were farm labourers and had joined the struggle against injustice.
(4) Being land owners, they wanted to dominate over the peasant organisations.

---

**58.** 1934 नंतर क्रांतीकारी संघटना जवळ जवळ प्रभावहीन झाल्या कारण
(1) गांधीजीचे अहिंसावादी आंदोलन जनतेने पसंत केले.
(2) इंग्रजांच्या जुलमी कार्यवाहीमुळे क्रांतीकारक संघ मागे पडले.
(3) गुप्ततेची गरज असल्यामुळे सामान्य जनतेला विश्वासात घेतले नाही.
(4) क्रांतीकारकांना मार्गदर्शन करण्यास मध्यवर्ती नेतृत्व नव्हते.

Why did the militant revolutionary organisations become ineffective after 1934 ?
(1) People preferred Gandhiji's non-violent movement.
(2) Due to British suppression revolutionary groups suffered badly.
(3) Secrecy had to be maintained so masses were not taken into confidence.
(4) There was no centralised leadership to guide the revolutionaries.

---

**59.** सुभाष चंद्र बोस हयांच्या संदर्भात असलेल्या खालील घटना कालक्रमानुसार लावा :
अ. त्यांचे जर्मनीस पलायन
ब. त्यांचे जपान येथे आगमन
क. फॉरवर्ड ब्लॉक ची स्थापना
ड. सिंगापूर येथे इंडियन इंडिपेंडन्स लीग चे अध्यक्षपद

(1) क, ब, ड, अ (2) क, अ, ड, ब (3) क, अ, ब, ड (4) क, ब, अ, ड

With reference to Subhash Chandra Bose, arrange the following events chronologically :
a. His escape to Germany
b. His arrival in Japan
c. Establishment of Forward Bloc
d. President of Indian Independence League in Singapore

(1) c, b, d, a (2) c, a, d, b (3) c, a, b, d (4) c, b, a, d

---

**60.** 1947 मध्ये जवाहरलाल नेहरू म्हणाले "पहिले काम प्रथम केले पाहिजे आणि पहिले काम म्हणजे ________."
(1) निर्वासितांचे पुनर्वसन (2) संस्थानांचे विलिनीकरण
(3) प्रशासकीय व्यवस्थेची पुनर्रचना (4) भारतात सुस्थिरता आणि भारताची सुरक्षितता

Jawaharlal Nehru declared in 1947, "First things must come first and the first thing is ________ ."
(1) rehabilitation of refugees (2) integration of Princely States
(3) reorganisation of administrative system (4) security and stability of India

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**61.** महाराष्ट्रात भारताच्या सर्व दिशांनी स्थानांतर होत असते. याबाबतीत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(1) महाराष्ट्रात होणारी 1/3 स्थानांतरे ही बिहारमधून होतात

(2) बंगालमधून येणारे 30% पेक्षा जास्त स्थानांतरीत पुरुष हे मुंबई उपनगर व ठाणे जिल्हयात येतात

(3) पुण्यात येणारे बहुसंख्य स्थानांतरीत पुरुष हे उत्तर कर्नाटकामधून येतात.

(4) नागपूरला येणारे स्थानांतरीत पुरुष हे तामिळनाडूतून येतात

Maharashtra receives immigrants from all the directions in India. Which of the following statements is valid about migrations to Maharashtra ?

(1) One-third of total immigrants are from Bihar.

(2) More than 30% of the total male migrants from West Bengal enter Mumbai Suburban district and Thane.

(3) Majority of the male migrants coming to Pune are from North Karnataka.

(4) Most of the male migrants coming to Nagpur are from Tamil Nadu.

---

**62.** खालील विधान 'अ' आणि कारण 'र' वाचा :

*विधान 'अ' :* महाराष्ट्रातील पठारी प्रदेशात पुंजीकृत वस्त्यांचा आकृतीबंध आढळतो.

*कारण 'र' :* महाराष्ट्रातील लाव्हा निर्मित पठारी प्रदेशात सुपीक जमीन पाणी पुरवठयाच्या चांगल्या सोयी, व शेतीचा चांगला विकास आढळतो.

योग्य पर्याय निवडा :

(1) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असून 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देते.

(2) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असली तरी 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देत नाही.

(3) 'अ' सत्य असून 'र' असत्य आहे.

(4) 'अ' असत्य असून 'र' सत्य आहे.

Read the following statements Assertion 'A' and Reason 'R' :

*Assertion 'A' :* Clustered settlement pattern is observed over plateau region of Maharashtra.

*Reason 'R' :* The lava plateau region of Maharashtra comprises fertile soil, good water supply and well developed agriculture.

Select the correct option :

(1) Both 'A' and 'R' are true and 'R' is the correct explanation of 'A'.

(2) Both 'A' and 'R' are true but 'R' is not the correct explanation of 'A'.

(3) 'A' is true and 'R' is false.

(4) 'A' is false and 'R' is true.

---

**63.** खाली भारतातील नदी जल-प्रदूषणाबाबत काही विधाने दिली आहेत. त्यापैकी कोणते विधान ***चूक*** आहे ?

(1) भारतातील निर्माण होणाऱ्या त्याज्य/टाकाऊ पाण्यापैकी फक्त 26% पाण्यावर प्रक्रिया केली जाते.
(2) त्याज्य/टाकाऊ पाण्यावरील प्रक्रिया जास्तीत जास्त 89% पर्यंतच असते.
(3) महानदीच्या तीरावर सर्वात जास्त त्याज्य/टाकाऊ पाणी सोडणारी शहरे वसली आहेत.
(4) त्याज्य/टाकाऊ पाणी प्रक्रिया सर्वात जास्त कृष्णानदी खोरे विभागात होते.

Which of the following statements regarding river water pollution in India is ***invalid*** ?

(1) Only 26% of the wastewater generated in India is treated.
(2) The maximum level of treatment of wastewater is 89%.
(3) Mahanadi has maximum number of towns releasing wastewater located on its banks.
(4) The highest wastewater treatment is done in Krishna river basin.

---

**64.** भारत सरकारने पाणी वापराबाबत काही निर्देश ठरवून दिले आहेत ? महाराष्ट्रासाठी कोणती जोडी ***चूकीची*** आहे ?

(1) महापालीका क्षेत्र — 135 लिटर दर डोई दर दिवशी
(2) 'अ' गटातील नगरपालिका — 170 लिटर दर डोई दर दिवशी
(3) 'ब' गटातील नगरपालिका — 100 लिटर दर डोई दर दिवशी
(4) ग्रामीण विभाग — 40 लिटर दर डोई दर दिवशी

Government of India has laid down certain standards of water consumption in India. For Maharashtra which of the following is ***not*** correct ?

(1) Corporations — 135 liters per capita per day
(2) 'A' class Municipal Councils — 170 liters per capita per day
(3) 'B' class Municipal Councils — 100 liters per capita per day
(4) Rural areas — 40 liters per capita per day

---

**65.** भारतात पर्यावरण व वन मंत्रालय आणि आय्.आय्.टी. दिल्ली यांनी एकत्रितपणे देशातील प्रदूषित शहरांचे सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील उतरत्या क्रमात प्रदूषित शहरे कोणती ?

(1) चंद्रपूर — डोंबिवली — औरंगाबाद — तारापूर
(2) चंद्रपूर — औरंगाबाद — डोंबिवली — तारापूर
(3) तारापूर — औरंगाबाद — चंद्रपूर — डोंबिवली
(4) तारापूर — चंद्रपूर — औरंगाबाद — डोंबिवली

Indian Ministry of Environment and Forests and I.I.T. Delhi have conducted a countrywide survey for listing the most polluted towns in India. According to this survey, what is the correct order of the polluted towns in Maharashtra in a descending order ?

(1) Chandrapur — Dombivali — Aurangabad — Tarapur
(2) Chandrapur — Aurangabad — Dombivali — Tarapur
(3) Tarapur — Aurangabad — Chandrapur — Dombivali
(4) Tarapur — Chandrapur — Aurangabad — Dombivali

---

**66.** इ.स. 1912 मध्ये भूखंडवहनाची संकल्पना कोणी मांडली ?

(1) अ. व्हॉन हंबोल्ट (2) अ. वेबर

(3) अ. वेगनर (4) कार्ल रिटर

Who propounded the concept of Continental Drift theory in the year 1912 ?

(1) A. Von Humboldt (2) A. Weber

(3) A. Wegener (4) Karl Ritter

---

**67.** आजच्या अनेक खंडांच्या निर्मितीच्या अगोदर एकजिनसी खंड होता त्याचे नाव काय होते ?

(1) गोंडवाना (2) लॉरेंशिया (3) पॅन्जिया (4) टेथिस

Before creation of different continents, a homogeneous continent existed known as

(1) Gondwana (2) Laurentia (3) Pangea (4) Tethys

---

**68.** खालील वैशिष्ठये कोणत्या भूकंप लहरीची आहेत ?

अ. भूकंप केंद्रापासून सरळ दिशेने प्रवास करतात आणि भूपृष्ठावर येतात.

ब. जास्त घनतेच्या भागातून जाताना लहरींचा वेग वाढतो.

क. द्रव पदार्थातून जाताना लहरींचा वेग मंदावतो.

(1) प्राथमिक लहरी (2) दुय्यम लहरी

(3) भूपृष्ठ लहरी (4) सामान्य लहरी

Which type of earthquake waves have the following characteristics ?

a. Travel in straight direction reaching the surface from the centre point of earthquake.

b. While travelling through the high density zone, the speed increases.

c. While travelling through the liquid zone, the speed decreases.

(1) Primary waves (2) Secondary waves

(3) Surface waves (4) Normal waves

---

**69.** जर्मन गव्हर्नमेंट डेव्हलपमेंट बँकेच्या अर्थसहाय्याने ग्रामीण पाणी पुरवठा 'आपल पाणी' प्रकल्प पुढील कोणत्या जिल्हयात राबविला जात आहे ?

(1) नागपूर — अमरावती — अकोला (2) धुळे — जळगाव — नंदूरबार

(3) सांगली — सातारा — कोल्हापूर (4) पुणे — अहमदनगर — औरंगाबाद

In which of the following districts is the project 'Apala Pani' getting implemented for rural water supply with the assistance of German Government Development Bank ?

(1) Nagpur — Amaravati — Akola (2) Dhule — Jalgaon — Nandurbar

(3) Sangli — Satara — Kolhapur (4) Pune — Ahmednagar — Aurangabad

---

**70.** कोणत्या विभागांत सारखे (आकडयांत) जिल्हे आहेत ?

(1) नाशिक, पुणे, अमरावती (2) नाशिक, पुणे, नागपूर

(3) नाशिक, कोंकण, अमरावती (4) नागपूर, कोंकण, पुणे

Which divisions have equal number of districts ?

(1) Nashik, Pune, Amravati (2) Nashik, Pune, Nagpur

(3) Nashik, Konkan, Amravati (4) Nagpur, Konkan, Pune

---

**71.** कोठे 2500 मिमि पावसाची नोद झालेली ***नाही*** ?

अ. रायगड जिल्हयातील माथेरान व कर्जत

ब. रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड व लांजा

क. सिंधूदुर्ग जिल्हयातील आंबोली व कणकवली

ड. पुणे जिल्हयातील खंडाळा व लोणावळा

इ. कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा व राधानगरी

(1) अ, ब (2) ब, इ

(3) अ, इ (4) वरील कोणताही पर्याय योग्य नाही

Which places given below have ***not*** recorded more than 2500 mm of rainfall ?

a. Matheran and Karjat in Raigarh District

b. Mandangarh and Lanja in Ratnagiri District

c. Amboli and Kankavli in Sindhudurg District

d. Khandala and Lonavala in Pune District

e. Gaganbavda and Radhanagari in Kolhapur District

(1) a, b (2) b, e

(3) a, e (4) No option is correct

---

**72.** पृथ्वीचा केंद्रभाग कोणत्या नावाने ओळखला जातो ?

(1) सिआल (2) सायमा (3) निफे (4) शिलावरण

How is the core of the Earth known ?

(1) Sial (2) Sima (3) Nife (4) Crust

---

**73.** पृथ्वीचे भूकवच आणि मध्यावरण यांच्या दरम्यान __________ ही विलगता आढळते.

(1) मोहोरव्हिसीक (2) गटेनबर्ग (3) विचर्ट (4) भूभौतीक

The __________ discontinuity appears between the Earth's crust and the mantle.

(1) Mohorvicic (2) Gutenberg (3) Weichert (4) Geophysical

---

**74.** 'व्ही' आकाराच्या दऱ्या, घळई, जलप्रपात ही भूरुपे खालीलपैकी कोणत्या कारणामुळे निर्माण होतात ?

(1) नदी (2) हिमनदी

(3) समुद्रलाटा (4) भूमिगत पाणी

Which of the following is responsible for 'V' shaped valleys, gorges and waterfall relief features ?

(1) River (2) Glacier

(3) Sea waves (4) Underground water

---

**75.** खाली काही खनिजे व त्यांची खाणकाम स्थाने यांच्या जोडया दिल्या आहेत त्यापैकी कोणती जोडी **चूक** आहे ?

(1) सोने — हत्ती (2) पायराईट — अमजोर

(3) टंगस्टन — डेगना (4) निकेल — कामटी

Following are the pairs of minerals and their mining sites. Point out the ***incorrect*** pair.

(1) Gold — Hatti (2) Pyrite — Amjor

(3) Tungsten — Degana (4) Nickel — Kamptee

**76.** खालील राज्ये त्यांच्या लोकसंख्येच्या उतरत्या क्रमात लावा :

हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश

(1) उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश व अरुणाचल प्रदेश

(2) उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश व अरुणाचल प्रदेश

(3) उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश व हिमाचल प्रदेश

(4) उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश व हिमाचल प्रदेश

Arrange the following states in the descending order of their population :

Himachal Pradesh, Uttar Pradesh, Arunachal Pradesh, Madhya Pradesh and Andhra Pradesh

(1) Uttar Pradesh, Madhya Pradesh, Andhra Pradesh, Himachal Pradesh and Arunachal Pradesh

(2) Uttar Pradesh, Andhra Pradesh, Madhya Pradesh, Himachal Pradesh and Arunachal Pradesh

(3) Uttar Pradesh, Andhra Pradesh, Madhya Pradesh, Arunachal Pradesh and Himachal Pradesh

(4) Uttar Pradesh, Madhya Pradesh, Andhra Pradesh, Arunachal Pradesh and Himachal Pradesh

**77.** पश्चिम मैदानाच्या दक्षिण भागातील शुष्क वाळवंटी प्रदेशात प्रामुख्याने __________ आढळतात.

(1) रांजण खळगे (2) खाऱ्या पाण्याची सरोवरे

(3) गोडया पाण्याची सरोवरे (4) नैसर्गिक गुहा

Desert area of southern part of the Western Plain exhibits __________ .

(1) Pot holes (2) Salt water lakes

(3) Sweet water lakes (4) Natural caves

**78.** छोटा नागपूर पठार व शिलाँग पठार यांच्या दरम्यानचा प्रदेश खालीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) खचदरीचा

(2) गंगेच्या खनन कार्यामुळे तयार झालेला

(3) अधोभ्रंशीत प्रदेशाचा

(4) गंगेच्या गाळाच्या संचयनातून अधोवक्रीत झालेला

The area between Chhota Nagpur Plateau and Shillong Plateau is __________ .

(1) a graben

(2) formed by erosion of Ganga

(3) a down faulted region

(4) a down warped region by which Ganga has deposited sediments

**79.** यारदांग हे भूरूप कोणत्या प्रदेशात आढळते ?

(1) महासागरीय (2) वाळवंटी (3) आर्द्रप्रदेश (4) हिमाच्छादीत

Where are the Yardangs found ?

(1) Oceans (2) Deserts (3) Wetlands (4) Snowfields

---

**80.** कायमस्वरूपी व हंगामी हिमाच्छादीत प्रदेशाच्या दरम्यानचा प्रदेश कोणत्या नावाने ओळखतात ?

(1) हिमक्षेत्रे (2) हिमटोपी

(3) हिमनदी (4) वरीलपैकी नाही

What is the zone between permanent and seasonal snow known as ?

(1) Snowfields (2) Ice caves

(3) Glacier (4) None of the above

---

**81.** बॉम्बे हाय येथे पहिली तेल विहिर केव्हा खोदली गेली ?

(1) 13 मार्च 1999 (2) 3 फेब्रुअरी 1974

(3) 1 मे 1960 (4) 10 ऑगस्ट 1948

When was the first oil well at the Bombay High oilfields drilled ?

(1) 13 March 1999 (2) 3 February 1974

(3) 1 May 1960 (4) 10 August 1948

---

**82.** खालील कोणत्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी नदीने विशिष्टपणे अर्धवर्तुळाकार आकार घेतल्याने नदीचे तसे नाव पडले आहे ?

(1) देहू (2) आळंदी (3) पंढरपूर (4) नाशिक

Name the sacred place where the river has taken its name after its semicircular shape.

(1) Dehu (2) Alandi (3) Pandharpur (4) Nashik

---

**83.** खाली काही निसर्ग पर्यटन प्रकार आणि त्यांची स्थाने यांच्या जोडया दिल्या आहेत त्यातील ***अयोग्य*** जोडी ओळखा.

(1) नदी परिक्रमा पर्यटन — कोलाड (2) आदिवासी निवास — कडूस

(3) भू-भौतिक पर्यटन — सावंतवाडी (4) स्क्युबा डायव्हिंग — तारकर्ली

Following are the pairs of eco-tourism types and their locations. Find out the ***incorrect*** pair.

(1) River trail camp — Kolad (2) Tribal resort — Kadus

(3) Geographical resort — Sawantwadi (4) Scuba diving — Tarkarli

---

84. मलेरिया हा भारत तसेच महाराष्ट्रामध्ये प्रसार पावलेला रोग आहे. मलेरिया बाबत कोणते विधान ***असत्य*** आहे ?

अ. मुंबई ही मलेरियाची राज्यातील राजधानी आहे.

ब. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा मलेरिया ग्रस्त जिल्हा आहे.

क. महाराष्ट्र हे देशात आठव्या क्रमांकाचे मलेरियाग्रस्त राज्य आहे.

ड. ओरिसा हे भारतातील सर्वाधिक मलेरियाग्रस्त राज्य आहे.

(1) फक्त अ

(2) अ, ब आणि ड

(3) अ, ब आणि क

(4) फक्त क

Malaria is one of the widely spread diseases in India as well as in the State. What is ***not*** true about malaria ?

a. Mumbai is the State's malaria capital.

b. The second most affected area is Gadchiroli district in Maharashtra.

c. Maharashtra is the $8^{th}$ most affected State of malaria in India.

d. Orissa is the leading State in malaria infection.

(1) a only

(2) a, b and d

(3) a, b and c

(4) c only

---

85. पुढील कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) महाराष्ट्राच्या लोकसंख्यावाढीचा वेग भारतापेक्षा कमी आहे.

(2) लोकसंख्या व क्षेत्रफळ दोन्ही बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.

(3) महाराष्ट्रांची लोकसंख्या दुप्पट होण्यास सन 1901 पासून 60 वर्षे लागली.

(4) 1961 पासून 40 वर्षात महाराष्ट्राची लोकसंख्या दुपटीपेक्षा अधिक झाली.

Which of the following statements is ***incorrect*** ?

(1) The rate at which the population is growing in Maharashtra is lower than that of India.

(2) Maharashtra is second both in terms of the population and area in the country.

(3) Maharashtra took 60 years in doubling its population since 1901.

(4) Maharashtra, however, more than doubled up its population in 40 years since 1961.

86. खालील विधान 'अ' आणि कारण 'र' वाचा :

*विधान 'अ' :* द्रवरुपातील बेसिक लाव्हा प्रामुख्याने पठार निर्मितीला कारणीभूत असतो.

*कारण 'र' :* ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या बेसिक लाव्हाचा विलय बिंदू हा अतिशय कमी असतो.

योग्य पर्याय निवडा :

(1) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असून 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देते.

(2) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असली तरी 'र' हे 'अ' चे सुयोग्य स्पष्टीकरण देत नाही.

(3) 'अ' सत्य असून 'र' असत्य आहे.

(4) 'अ' असत्य असून 'र' सत्य आहे.

Read the following statements Assertion 'A' and Reason 'R' :

*Assertion 'A' :* Basic lava is found in liquid form and is responsible for widespread plateau formation.

*Reason 'R' :* Melting point of basic lava flowing out of volcano is very low.

Select the correct option :

(1) Both 'A' and 'R' are true and 'R' is the correct explanation of 'A'.

(2) Both 'A' and 'R' are true but 'R' is not the correct explanation of 'A'.

(3) 'A' is true and 'R' is false.

(4) 'A' is false and 'R' is true.

---

87. खालीलपैकी कोणती आदिवासी जमात महाराष्ट्रात "आदिम जमात" या संज्ञेत अंतर्भूत ***नाही*** ?

(1) माडीया गोंड (2) भिल्ल

(3) कोरकू (4) पावरा

Which of the following tribes is ***not*** included in the list of Primitive tribes in Maharashtra ?

(1) Madia Gond (2) Bhil

(3) Korku (4) Pawra

---

88. समुद्रकडा हे भूमीस्वरूप समुद्र लाटांच्या ________ कार्यामुळे निर्माण होतो.

(1) संचयन (2) खनन

(3) वहन (4) यापैकी नाही

Sea cliff is a relief feature created by ________ work of sea waves.

(1) Depositional (2) Erosional

(3) Transportational (4) None of these

---

89. महाराष्ट्र सरकारने 2006 साली पर्यटन धोरण विकसित केले. खालीलपैकी कोणते विधान या पर्यटन धोरणाचा भाग ***नाही*** ?

अ. करमणूक करामधून सूट

ब. किनारी नियंत्रण कायद्यातून सूट

क. पाणी आणि विजेचे दर औद्योगिक गटानुसार

ड. मालमत्ता करातून आणि अकृषि करातून सूट

इ. अविकसित प्रदेशातून सूट

योग्य पर्याय निवडा :

(1) अ, क आणि इ (2) ब आणि क (3) ब आणि ड (4) फक्त ब

Maharashtra Government declared its Tourism Policy in 2006. What does it ***not*** cover ?

a. Exemption from entertainment tax

b. Exemption from coastal regulation tax

c. Water and electricity tariff at industrial rate

d. Exemption from property tax and non-agricultural tax

e. Exemption from no development tax

Select the correct option :

(1) a, c and e (2) b and c (3) b and d (4) B only

---

90. भारतातील स्थानांतरीत लोकसंख्येच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहे/आहेत ?

अ. भारतातील 25% गरीब लोकसंख्या शहरात राहते.

ब. भारतातील शहरी ते शहरी व शहरी ते ग्रामीण स्थानांतरीत लोकसंख्येपेक्षा ग्रामीण ते शहरी लोकसंख्येचे स्थानांतर प्रमाण जास्त आहे.

क. भारतातील स्थानांतरीत होणाऱ्या लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार शहरी केंद्रे कोलकत्ता, मुंबई, दिल्ली अशी आहेत.

ड. भारतांतर्गत सर्वात जास्त लोकसंख्येचे स्थानांतर विवाहामुळे होते.

योग्य पर्याय निवडा :

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क

(3) अ आणि क (4) अ, ब आणि ड

Which of the following statements regarding migratory population in India is/are correct ?

a. 25% of the country's poor live in urban areas.

b. Rural-urban migratory population is more than urban-urban and urban-rural migratory population in India.

c. Urban centres receiving migratory population in descending order are Kolkata, Mumbai and Delhi.

d. Largest number of migrants within India are because of marriages.

Select the correct option :

(1) a, b and c (2) b and c

(3) a and c (4) a, b and d

**91.** योग्य जोडया लावा :

| | *यादी I* *(वातावरणाचे थर)* | | *यादी II* *(उंची)* |
|---|---|---|---|
| अ. | तापांबर | I. | 500 ते 1050 किमी |
| ब. | स्थितांबर | II. | 16 ते 50 किमी |
| क. | आयनांबर | III. | 0 ते 16 किमी |
| ड. | बाह्यांबर | IV. | 80 ते 500 किमी |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | II | IV | I | III |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | I | III | IV | II |

Match the following pairs :

| | *List I* *(Layers of Atmosphere)* | | *List II* *(Height)* |
|---|---|---|---|
| a. | Troposphere | I. | 500 to 1050 km |
| b. | Stratosphere | II. | 16 to 50 km |
| c. | Ionosphere | III. | 0 to 16 km |
| d. | Exosphere | IV. | 80 to 500 km |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | II | IV | I | III |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | I | III | IV | II |

**92.** पाण्याचे वाटप करण्यासंबंधी पाणी पंचायत मॉडेल, विलासराव साळुंखेंच्या प्रयत्नाने पुणे जिल्हयातील कोणत्या तालुक्यात सुरू करण्यात आले ?

(1) बारामती (2) खेड (3) पुरंदर (4) मावळ

Pani Panchayat Model of water distribution began with Vilasrao Salunke's efforts in which of the following Tehsils of Pune district ?

(1) Baramati (2) Khed (3) Purandar (4) Maval

**93.** एखाद्या अक्षवृत्तावर एखाद्या ठिकाणी पोहोचणारी सौरशक्ती वर्षात निरनिराळी असते कारण

(1) ऋतूपरत्वे सूर्यकिरणांनी पृथ्वीच्या पृष्ठभागाशी केलेला कोण बदलतो

(2) दिवसाची लांबी बदलते

(3) सूर्यापासूनचे अंतर बदलते

(4) वरील सर्व

The amount of solar radiation reaching a place on a particular latitude varies through the year because of

(1) seasonal changes in angle of incidence of the rays to the surface of the Earth

(2) length of day changes

(3) distance from the Sun changes

(4) All the above

---

**94.** वातावरणातील खालीलपैकी कोणत्या एका थरातील खालच्या भागात उंची परत्वे तापमान कमी होत ***नाही*** ?

(1) तापांबर (2) स्थितांबर

(3) आयनांबर (4) वरीलपैकी एकही नाही

Which one of the following atmospheric layer's lower part does ***not*** show decrease in temperature with increasing altitude ?

(1) Troposphere (2) Stratosphere

(3) Ionosophere (4) None of the above

---

**95.** खालीलपैकी कोणते एक विधान उंची परत्वे सरासरी तापमानातील होणारी घट बरोबर दर्शविते ?

(1) 1° सें. दर 160 मी. ला

(2) 1° सें. दर 170 मी. ला

(3) 1° सें. दर 100 मी. ला

(4) 1° सें. दर 260 मी. ला

Which one of the following alternatives correctly shows the average rate of decrease in temperature with increasing altitude ?

(1) 1°C per 160 m

(2) 1°C per 170 m

(3) 1°C per 100 m

(4) 1°C per 260 m

---

**96.** योग्य जोडया लावा :

| यादी *I* (*वृष्टीचे प्रकार*) | | यादी *II* (*आवश्यक स्थिती*) |
|---|---|---|
| अ. | अभिसरण पर्जन्य | I. कमीदाबाशी संबंध असतो |
| ब. | प्रतिरोध पर्जन्य | II. हवेचे तापमान वाढल्याने |
| क. | आवर्त पर्जन्य | III. समुद्रावरुन येणारा उबदार हवेचाझोत हिवाळयात थंड जमीनीवरुन जातो |
| ड. | सीमावर्ती पर्जन्य | IV. बाष्पसंयुक्त हवेस डोंगर उतारावरुन वर सरकावेच लागते |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | IV | II | I | III |
| (4) | II | IV | I | III |

Match the following pairs :

| *List I* (*Types of Rain*) | | *List II* (*Required conditions*) |
|---|---|---|
| a. | Conventional | I. Associated with depression |
| b. | Orographic | II. Air on being heated |
| c. | Cyclonic | III. When warm oceanic air-mass passes over cold land in winter |
| d. | Border | IV. When a saturated air-mass is forced to rise by a mountain |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | IV | II | I | III |
| (4) | II | IV | I | III |

**97.** योग्य जोडया लावा :

| यादी I (वारे) | | यादी II (स्थान) | |
|---|---|---|---|
| अ. | गरजनारे चाळीस | I. | 50° द. अक्षवृत्त |
| ब. | शूर पश्चिमी वारे | II. | 5° उ. ते 5° द. अक्षवृत्त |
| क. | उन्मत्त साठ | III. | 40° द. अक्षवृत्त |
| ड. | निर्वात पट्टा (Doldrums) | IV. | 60° द. अक्षवृत्त |


| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | IV | II |
| (2) | III | I | IV | II |
| (3) | IV | III | II | I |
| (4) | I | II | III | IV |

Match the following pairs :

| List I (Winds) | | List II (Location) | |
|---|---|---|---|
| a. | Roaring Forties | I. | 50° S. latitude |
| b. | Brave West Winds | II. | 5° N to 5° S latitude |
| c. | Striking Sixties | III. | 40° S latitude |
| d. | Doldrums | IV. | 60° S latitude |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | IV | II |
| (2) | III | I | IV | II |
| (3) | IV | III | II | I |
| (4) | I | II | III | IV |


**98.** खाली दिलेला नकाशा नदीचे खोरे दर्शवितो. खालीलपैकी कोणत्या एका नदीचे खोरे नकाशात दाखविलेले आहे ?




(1) तापी-पुर्णा खोरे (2) गोदावरी खोरे

(3) कृष्णा खोरे (4) उल्हास खोरे

Given below is a map of a drainage basin. Which one of the following river basins is shown in the map ?




(1) Tapi-Purna basin (2) Godavari basin

(3) Krishna basin (4) Ulhas basin

**99.** खालीलपैकी कोणती भारतीय नदी जगातील 10 नष्ट होण्याच्या मार्गावरील नद्यांपैकी एक आहे ?

(1) यमुना (2) गंगा (3) गोदावरी (4) कृष्णा

Which of the following Indian rivers is among the 10 dying rivers of the world ?

(1) Yamuna (2) Ganga (3) Godavari (4) Krishna

---

**100.** खालील विधानांचा नीट विचार करा :

भारतातील जैवविविधतेची कारणे

अ. हवामान स्थितीमधील विविधता

ब. अफाट मानवी लोकसंख्या

क. देशाचे स्थान आणि विस्तार

ड. भूगर्भरचनेतील बदल

कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड

(3) अ, क आणि ड (4) ब, ड आणि अ

Consider the following statements :

The biodiversity in India is mainly due to

a. Diverse climatic conditions

b. Large size of human population

c. Large size and location of nation

d. Venation in geological structure

Which of these statements are correct ?

(1) a, b and c (2) b, c and d

(3) a, c and d (4) b, d and a

---

**101.** खालीलपैकी कोणती एक जोडी बरोबर जुळते ?

(1) 1963 — वन्यजीव संरक्षण कायदा

(2) 1983 — हत्ती/गजराज प्रकल्प

(3) 1993 — सुसर/मगर प्रसवण/निंपजवण प्रकल्प

(4) वरीलपैकी एकही नाही

Which one of the following pairs is correctly matched ?

(1) 1963 — Wildlife Protection Act

(2) 1983 — Project Elephant

(3) 1993 — Crocodile Breeding Project

(4) None of the above

**102.** 1991 मध्ये महाराष्ट्रात बृहनमुंबई, पुणे, आणि नागपूर ही दशळाक्षी शहरे होती. 2001 पर्यंत कोणती चार नवीन शहरे या गटात सामिल झाली ?

(1) अकोला, अमरावती, यवतमाळ आणि बुलढाणा

(2) औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक आणि जळगाव

(3) ठाणे, कल्याण-डोंबिबली, नाशिक आणि पिंपरी-चिंचवड

(4) कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि उस्मानाबाद

In 1991, Greater Mumbai, Pune and Nagpur were million plus cities. Which four joined the rank from Maharashtra by 2001 ?

(1) Akola, Amaravati, Yavatmal and Buldhana

(2) Aurangabad, Ahmadnagar, Nashik and Jalgaon

(3) Thane, Kalyan-Dombivali, Nashik and Pimpri-Chinchwad

(4) Kolhapur, Sangli, Solapur and Osmanabad

---

**103.** मुंबई शहराचे 'स्थान' आणि 'स्थितीवैशिष्ट्य' मुंबईच्या विकासासाठी कारणीभूत आहे कारण

अ. मुंबई एक नैसर्गिक बंदर आहे व सागरी मार्गाने सर्व जगाशी जोडलेले आहे.

ब. मुंबई देशाच्या सर्व भागाशी रस्ते व रेल्वे मार्गाने जोडलेले आहे ज्या मुळे देशाच्या इतर भागाशी समृद्ध असे आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक संबंध विकसित झालेले आहे.

क. शासनाने मुंबईच्या विकासावर विशेष लक्ष पुरविलेले आहे.

ड. मुंबई एक औद्योगिक शहर आहे.

वरील विधाना पैकी कोणते बरोबर आहे ?

(1) अ (2) ब

(3) अ आणि ब (4) क आणि ड

'Site' and 'Situation' of Mumbai are responsible for its growth because

a. Mumbai is a natural port and it is linked with the rest of the world.

b. Mumbai is well connected with all parts of the nation by roads and railways which strengthen economic, social and cultural relationship with other parts of the nation.

c. Government specially focussed on the development of Mumbai.

d. Mumbai is an industrial city.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a (2) b

(3) a and b (4) c and d

**104.** जपान मधील क्योटो शहरात 1997 मध्ये झालेल्या क्योटो थर्मल ट्रीटी (क्योटो प्रोटोकॉल) मध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

(1) 2008 – 12 दरम्यान कार्बन डायऑक्साइड वायूत 30 प्रतिशत पर्यंत कपात

(2) हरितगृह वायूच्या कपातीचा निर्धारित भागाचे हस्तांतरण

(3) सिंथेटिक रासायनिक घटकाचे उत्पादन कमी करणे

(4) हलोन वायूचे उत्पादन थांबविणे

Kyoto Thermal Treaty (Kyoto Protocol) signed in 1997 in Kyoto city of Japan prescribes

(1) 30% cut in carbon dioxide by 2008 – 12

(2) mutual transfer of fixed quota of cut in emission of greenhouse gasses

(3) decrease the production of synthetic chemical compounds

(4) freeze the production of halons

---

**105.** कार्बन डायऑक्साइड, जलवाष्प आणि ह्यालोजनेटेड (halogenated) वायूंच्या हरितगृह परिणामांमुळे भूपृष्ठावरील तापमान वाढते कारण

(1) हे वायू सौर उर्जेला भूपृष्ठा पर्यंत पोचू देतात

(2) हे वायू भूपृष्ठा द्वारे उत्सर्जित उष्णता ग्रहण करतात आणि तिला परत भूपृष्ठा कडे उत्सर्जित करतात

(3) या वायुंचा भूपृष्ठा वरील तापमान वाढविण्यात कोणताही सहभाग नाही

(4) हे वायू हरितगृह परिणामाचे घटक नाहीत

Greenhouse effect of carbon dioxide, water vapour and halogenated gases is to increase the surface temperature of lower atmopshere because

(1) these gases allow solar radiation to reach Earth's surface

(2) these gases absorb terrestrial radiation and radiate it back to Earth

(3) these gases have no role in increasing temperature

(4) these gases are not at all a part of greenhouse effect

---

**106.** प्राकृतिक पर्यावरणात स्वयंनियमन करणाऱ्या अंतररचित (inbuilt) व्यवस्थेला म्हणतात

(1) होमियोस्तातीक मेक्यानिजम (2) प्रकाशसंस्लेषण

(3) जैवरासायनिक प्रक्रिया (4) निसर्गिक प्रक्रिया

The 'inbuilt self regulating mechanism' of natural environmental system is called

(1) Homeostatic mechanism (2) Photosynthesis

(3) Biochemical process (4) Natural process


---

**107.** हा महाराष्ट्रातील कोणता जिल्हा आहे ?



(1) रत्नागिरी (2) गडचिरोली
(3) सिंधूदुर्ग (4) ठाणे

Which district of Maharashtra is this ?




(1) Ratnagiri (2) Gadchiroli
(3) Sindhudurg (4) Thane

**108.** पुढील समाजांना त्यांच्या संख्येनुसार चढत्या क्रमात लावा :
(1) पारशी, क्रिश्चन, जैन, बुद्ध, मुस्लिम
(2) पारशी, क्रिश्चन, बुद्ध, जैन, मुस्लिम
(3) पारशी, क्रिश्चिन, जैन, मुस्लिम, बुद्ध
(4) पारशी, जैन, क्रिश्चन, बुद्ध, मुस्लिम

Arrange the following communities in the ascending order of their number/population :
(1) Parsis, Christians, Jains, Buddhists, Muslims
(2) Parsis, Christians, Buddhists, Jains, Muslims
(3) Parsis, Christians, Jains, Muslims, Buddhists
(4) Parsis, Jains, Christians, Buddhists, Muslims


---

**109.** नकाशातील डोंगर ओळखा :




(1) A – हरिशचंद्र, B – शंभू महादेव
(2) A – सातमाळा, B – हरिशचंद्र
(3) A – शंभू महादेव, B – बालाघाट
(4) A – शंभू महादेव, B – हरिशचंद्र

Identify the hills :




(1) A – Harischandra, B – Shambhu Mahadeva
(2) A – Satmala, B – Harischandra
(3) A – Shambhu Mahadeva, B – Balaghat
(4) A – Shambhu Mahadeva, B – Harischandra

**110.** जगातील 25 जैवविविधतेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणांपैकी दोन ठिकाणे भारतात आहेत. हयातील एक पश्चिम घाट आहे तर दुसरे कोणते ?

(1) पूर्व घाट

(2) पूर्व हिमालया

(3) राजस्थान वाळवंट

(4) सुंदरबन

Out of the 25 biodiversity hot spots in the world, India has two hot spots. One among them is Western Ghats, the other one is

(1) Eastern Ghats

(2) Eastern Himalayas

(3) Rajasthan deserts

(4) Sunderbans

---

**111.** कोणत्या प्राण्याचे वर्णन खाली केले आहे ?

"सुमारे 30 वर्षे जगतो, सारनाथशी जोडलेला, आशियाई व आफ्रिकन असे दोन प्रकार"

(1) सिंह (2) हत्ती

(3) वाघ (4) घोडा

Which animal's description is given below ?
"This animal lives for around 30 years, is associated with Sarnath, Asian and African are its two varieties."

(1) Lion (2) Elephant

(3) Tiger (4) Horse

**112.** पुढील विधानांचा विचार करा :

I. केवल नर हत्तींना सुळे असतात.

II. केवळ नर हरणांना शिंगे असतात.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) I बरोबर तर II चूक

(2) II बरोबर तर I चूक

(3) दोन्ही बरोबर

(4) दोन्ही चूक

Consider the following two statements :

I. Only the male elephants have tusks.

II. Only the male deer and antelopes have horns.

Which of the statements given above is/are true ?

(1) I is true, II is not

(2) II is true, I is not

(3) Both I and II are true

(4) Neither I nor II are true

**113.** कोणते झाड नत्र स्थिरीकरण करीत ***नाही*** ?

(1) गुलमोहर

(2) बाभूळ

(3) काळा सिरस

(4) सुरू

Which is ***not*** a nitrogen fixing tree ?

(1) *Delonix regia*

(2) *Acacia nilotica*

(3) *Albizia lebbeck*

(4) *Casuarina equisetifolia*

**114.** योग्य जोडया लावा :

| यादी I (जीवावरण) | | यादी II (स्थान) |
|---|---|---|
| अ. मन्नारचे आखात | | I. मध्य प्रदेश |
| ब. शिमलीपाल | | II. अरुनाचल प्रदेश |
| क. देहांग-देबांग | | III. ओरिसा |
| ड. पंचमढी | | IV. तामिळ नाडू |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | III | IV | I | II |

Match the following pairs :

| *List I* *(Biosphere)* | | *List II* *(Location)* |
|---|---|---|
| a. Gulf of Mannar | | I. Madhya Pradesh |
| b. Simlipal | | II. Arunachal Pradesh |
| c. Dehang-Debang | | III. Orissa |
| d. Panchmarhi | | IV. Tamil Nadu |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | III | IV | I | II |

**115.** खालील दोन्ही विधाने चुकीची असलेला पर्याय कोणता आहेत ?

अ. ढोर मुख्यतः दक्षिण महाराष्ट्रात आढळतात.
ब. होलार मुख्यतः पूर्व महाराष्ट्रात आढळतात.
क. डोंब कैकाडी मुख्यतः मध्य महाराष्ट्रात आढळतात.
ड. शेणवी मुख्यतः पश्चिम महाराष्ट्रात आढळतात.

(1) अ आणि ब
(2) ब आणि क
(3) क आणि ड
(4) कोणतेही नाही

Which of the following statements are ***incorrect*** ?

a. Dhors are prominently seen in South Maharashtra.
b. Holars are prominently seen in East Maharashtra.
c. Domb Kaikadi are prominently seen in Central Maharashtra.
d. Shenvi are prominently seen in West Maharashtra.

(1) a and b
(2) b and c
(3) c and d
(4) None of the above

**116.** ज्या खडका मध्ये 65 टक्के पेक्षा जास्त सिलीकाचे प्रमाण असते. त्यास काय म्हणतात ?

(1) बेसीक खडक (2) ॲसीडिक खडक
(3) मेट्यॉमॉरफीक खडक (4) प्लुटॉनिक खडक

Rocks which contain more than 65 per cent silica are called as

(1) Basic rocks (2) Acid rocks
(3) Metamorphic rocks (4) Plutonic rocks

---

**117.** खालीलपैकी कोणते मायक्रोफौना आहे ?

(1) बॅक्टेरिया (2) निमॅटोडस्
(3) ॲक्टीनोमायसेटस् (4) फंगी

Which of the following is a microfauna ?

(1) Bacteria (2) Nematodes
(3) Actinomycetes (4) Fungi

---

**118.** पिकांची पाण्याची गरज कशाशी संबंधीत असते ?

(1) इव्हापोट्रान्सपीरेशन (2) पोटेनशियल अबसार्बशन कोईफीशीएन्ट
(3) ड्राय मॅटर कंन्टेट ऑफ द प्लँट (4) सॉईल मीनेरॉलॉजी

Water requirement of a crop is related to its

(1) evapotranspiration (2) potential absorption coefficient
(3) dry matter content of plant (4) soil mineralogy

---

**119.** पडणाऱ्या पावसाच्या संवर्धनासाठी खोल जमिनीत खालीलपैकी कोणती पद्धत अतीशय महत्त्वाची आहे ?

(1) जमिनीच्या वरच्या थरात बदल करणे
(2) जमिनीच्या वरच्या थरात विशिष्ट आंतररचना करणे (कॉनफिगरेशन)
(3) खोल नांगरट करणे
(4) जमिनीशी उभे आच्छादन करणे

In deep vertisols, which method is the most important for rain water conservation ?

(1) Land surface modification
(2) Surface configuration
(3) Deep ploughing
(4) Vertical mulching

---

**120.** पाण्यामध्ये वायू विरघळणे ही क्रिया कोणता सिद्धांत वापरुन काढतात ?

(1) डारसीज् सिद्धांत (2) हेनरीज् सिद्धांत

(3) ॲव्होगाड्रोज् सिद्धांत (4) स्टोकस् सिद्धांत

Solubility of gases in water can be calculated by using which law ?

(1) Darcy's law (2) Henry's law

(3) Avogadro's law (4) Stokes' law

---

**121.** भारतात मिट्टी बचाओ (माती वाचवा) चळवळीला कुठे सुरवात झाली ?

(1) नागपूर, महाराष्ट्र (2) म्हैसूर, कर्नाटक

(3) दारभांगा, बिहार (4) होशंगाबाद, मध्य प्रदेश

Where did the "Mitti Bachao" (Save the Soil) movement start in India ?

(1) Nagpur, Maharashtra (2) Mysore, Karnataka

(3) Darbhanga, Bihar (4) Hoshangabad, Madhya Pradesh

---

**122.** अरनॉन यांचे मते किती अन्नद्रव्ये वनस्पतीचे निकोप वाढीसाठी गरजेची आहेत ?

(1) 4 (2) 8 (3) 16 (4) 25

According to Arnon, how many nutrients are essential for good plant growth ?

(1) 4 (2) 8 (3) 16 (4) 25

---

**123.** पर्यावरणात राखेचे (Fly-ash) प्रदुषण कशामुळे होते

(1) आईल रिफायनरी (2) थरमल पॉवर प्लँट

(3) सीड प्रोसेसिंग प्लँट (4) स्ट्रीप मायनिंग

"Fly-ash", the environmental pollutant, is generated by

(1) Oil-refinery (2) Thermal Power plant

(3) Seed processing plant (4) Strip mining

---

**124.** पिकांचे कोरड्या हवामानात अवर्षण प्रतिकारण कशाशी संबंधीत आहे ?

(1) उणे पाणी वापर क्षमता (2) अधिक पाणी वापर क्षमता

(3) जास्त पाणी वापर क्षमता (4) वरीलपैकी नाही

Drought resistance in plants is related to

(1) – ve water potential (2) + ve water potential

(3) surplus water potential (4) None of the above

---

**125.** हवामानाच्या कोणत्या घटकामुळे हवेचा दाब बदलतो ?

(1) पाऊस
(2) वारा
(3) आद्रता
(4) सर्वात महत्वाचा घटक वर नमूद नाही

Due to which meteorological factor does the the air-pressure change ?

(1) Rainfall
(2) Wind
(3) Humidity
(4) The most important factor is not noted above

**126.** खालीलपैकी कोणत्या राज्यात एरंडीचे उत्पादन अधिक होते ?

(1) गुजरात आणि आंध्र प्रदेश (2) महाराष्ट्र आणि कर्नाटक
(3) तामीळनाडू आणि ओरीसा (4) राजस्थान आणि बिहार

Which of the following states produce more castor ?

(1) Gujarat and Andhra Pradesh (2) Maharashtra and Karnataka
(3) Tamil Nadu and Orissa (4) Rajasthan and Bihar

**127.** भारतातील एकुण पर्जन्यमानापैकी दक्षिण-पश्चिम मोसमी पावसाचे योगदान किती आहे ?

(1) 40 ते 50 टक्के (2) 50 ते 60 टक्के
(3) 80 ते 90 टक्के (4) वरीलपैकी एकही नाही

What is the contribution of South-West monsoon to India's total rainfall ?

(1) 40 to 50 percent (2) 50 to 60 percent
(3) 80 to 90 percent (4) None of the above

**128.** मृदा तयार होण्याच्या प्रक्रीयेत खालीलपैकी कोणते क्रियाशिल घटक आहेत ?

(1) हवामान आणि प्रदेशाची स्वाभाविक रचना (2) वनस्पती आणि प्रदेशाची स्वाभाविक रचना
(3) वनस्पती आणि भौतीक उगम (वंश) (4) हवामान आणि वनस्पती

Which of the following are active factors of soil formation ?

(1) Climate and topography (2) Vegetation and topography
(3) Vegetation and parent material (4) Climate and vegetation

**129.** कृषि क्षेत्रात खालीलपैकी कोणते घटक आरोग्य आणि वातावरणावर प्रतिकुल परिणाम करतात ?

(1) गांडुळखत आणि शेणखत
(2) तणनाशके आणि किडनाशके
(3) सायकोसील आणि एन.ए.ए. (नेफथॅलीक ॲसिटीक ॲसिड)
(4) निळेहिरवे शेवाळ

Which of the following materials cause adverse health and environmental effects in agriculture ?

(1) Vermicompost and FYM (Farm Yard Manure)
(2) Herbicides and pesticides
(3) Cycocil and NAA (Naphthalic Acetic Acid)
(4) Blue green algae

**130.** खालीलपैकी कोणत्या मुलद्रव्याच्या कमतरतेची लक्षणे पिकाच्या शेवटच्या कळयावर दिसून येतात ?

(1) नत्र (2) पाळाश (3) जस्त (4) बोरॉन

The deficiency symptoms of which elements appear on terminal buds of crop ?

(1) Nitrogen (2) Potassium (3) Zinc (4) Boron

---

**131.** खालीलपैकी कोणते जिवाणूखत ऊस पिकामध्ये सर्वाधीक नत्र स्थिरीकरण करते ?

(1) अझॅटोबॅक्टर (2) अझोस्पीरीलियम

(3) रायझोबीयम (4) ॲसीटोबॅक्टर

Which of the following biofertilizers fix highest nitrogen in sugarcane crop ?

(1) Azotobacter (2) Azospirillum

(3) Rhizobium (4) Acetobacter

---

**132.** दख्खनच्या पठारावर आढळणाऱ्या सुपीक, अपुरा निचरा आणि चोपन व खारवटपणास प्रवृत्त होणारी जमीन कोणती ?

(1) खोंल काळी जमीन (2) लाल जमीन

(3) तपकिरी जमीन (4) पोयटयाची जमीन

Which soil found in Deccan Plateau has higher fertility, poor drainage and is prone to salinity and sodicity ?

(1) Deep black soil (2) Red soil

(3) Lateritic soil (4) Alluvial soil

---

**133.** खालीलपैकी कोणते पिक क्षारास कमी सहनशिल आहे ?

(1) भात (2) उस (3) तीळ (4) कापूस

Which of the following crops is poorly salt tolerant ?

(1) Rice (2) Sugarcane (3) Sesamum (4) Cotton

---

**134.** सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी असल्यास खालीलपैकी कशाचा अवलंब करावा ?

(1) जमीन एका हंगामात पडीक ठेवावी

(2) ठिबक आणि तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा

(3) एका आड एक सरी भिजवावी

(4) वरीलपैकी एकही नाही

Which of the following should be adopted if the availability of irrigation water is limited ?

(1) Keep the land fallow for one season

(2) Use of sprinkler and drip irrigation method

(3) Alternate furrow irrigation

(4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**135.** कोरडवाहु शेतीमध्ये खोल काळया जमिनी व्यतिरिक्त पावसाच्या पाणी साठयाच्या व्यवस्थापनेसाठी कोणती पद्धत योग्य आहे ?

(1) सरी आणि वरंबा पद्धत (2) रूंद सरी आणि वरंबा पद्धत

(3) खोलवर अच्छादन (4) शेततळे

In dryland agriculture, which is the suitable method of excess rainwater storage management for deep black soils ?

(1) Ridges and furrow method (2) Broad bed and furrow method

(3) Vertical mulch (4) Farm ponds

---

**136.** कम्पोस्ट खत तयार करण्यासाठी सेंद्रिय पदार्थातील कर्ब आणि नत्राचे गुणोत्तर किती असावे ?

(1) 10 : 1 (2) 30 : 1 (3) 50 : 1 (4) 60 : 1

What should be the carbon to nitrogen ratio of organic material for preparing compost ?

(1) 10 : 1 (2) 30 : 1 (3) 50 : 1 (4) 60 : 1

---

**137.** पावसाच्या थेंबांमुळे जमीनीचे धुपीवर कोणता मुख्य परिणाम होतो ?

(1) जमिनीच्या कणांची अलिप्तता होऊन त्यामुळे जमीनीची घडण बिघडणे

(2) पाणी साठयास सुरुवात होणे

(3) जमिनीतील ओलावा कमी होणे

(4) जोरात वाहणाऱ्या पाण्यामुळे जमीनीच्या कणांची वाहतुक होते

The main effect of raindrop erosion on soil is

(1) detachment of soil particles, thus destruction of soil structure

(2) beginning of water logging

(3) reducing soil moisture content

(4) transport of soil particles by fast flowing water

---

**138.** शाश्वत शेतीच्या उद्दीष्ट पूर्ती साठी कोणत्या शेती पद्धतीचा सहभाग महत्वाचा असतो ?

(1) सेंद्रिय शेती (2) कोरडवाहू शेती

(3) पावसावर आधारित शेती (4) चारा-गवत शेती

Which type of farming plays an important role in achieving the goal of sustainable agriculture ?

(1) Organic farming (2) Dry land farming

(3) Rain dependent farming (4) Ley farming

---

**139.** खालीलपैकी कोणत्या हवामान घटकानुसार लाँग-डे, शॉर्ट-डे आणि डे-न्युट्रल वनस्पती ठरवल्या जातात ?

(1) हवेचादाब

(2) आर्द्रता

(3) तापमान

(4) सर्वात महत्वाचा घटक वर नमूद नाही

According to which of the following meteorological factors, are the long-day, short-day and day-neutral plants decided ?

(1) Wind velocity

(2) Humidity

(3) Temperature

(4) The most important factor is not mentioned above

---

**140.** पाणलोट क्षेत्र आधारित जमीन व पाणी संवर्धन योजना मुख्यतः कशावर आधारित असते ?

(1) पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तंत्रज्ञान

(2) जमीन आणि माती संवर्धन

(3) पिकांचे नियोजन

(4) जमिनीच्या वापराच्या क्षमतेनुसार वर्गवारी करणे

The soil and water conservation planning on watershed basis mostly depends on

(1) Water harvesting management technique

(2) Land and soil conservation

(3) Crop planning

(4) Soil use capability classification

---

**141.** खालीलपैकी कोणत्या कार्यक्रमाच्या प्रस्थापनाला/विकासाला भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने हातभार लावला ?

(1) अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (डी.पी.ए.पी.)

(2) वाळवंट विकास कार्यक्रम (डी.डी.पी.)

(3) कोरड वाहु प्रदेशासाठी राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (एन.डब्लु.डी.पी.आर.ए.)

(4) बहुव्याप्ती असलेला पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (काऊडेप)

Which of the following programmes is promoted by the Ministry of Agriculture, Government of India ?

(1) DPAP

(2) DDP

(3) NWDPRA

(4) COWDEP

---

**142.** विशिष्ट जातीचे तिच्या पर्यावरणाशी संबंध या अभ्यासाला काय म्हणतात ?

(1) मेटेरॉलॉजी (2) ऑटइकॉलॉजी

(3) सिनेकॉलॉजी (4) टर्मिनॉलॉजी

Study of relationship of individual species with its environment is called as

(1) Meteorology (2) Autecology

(3) Synecology (4) Terminology

---

**143.** पाण्यातील कठीणता काढण्यासाठी जी क्रिया करतात/वापरतात त्यास काय म्हणतात ?

(1) झीओलाईट क्रिया (2) हॅबेरस् क्रिया

(3) ओस्टवाल क्रिया (4) वरीलपैकी नाही

The process used for removal of water hardness is known as

(1) Zeolite process (2) Haber's process

(3) Ostwald process (4) None of the above

---

**144.** कोणत्या प्रकारच्या मशागतीचा हेतू जमिनींची धूप थांबविण्यासाठी व पिकांची चांगली वाढ होऊन अधिक उत्पादनासाठी आहे ?

(1) धांन्याच्या ताटांचे बुडरवे, आच्छादन व मशागत

(2) शुन्य मशागत

(3) कमीतकमी मशागत

(4) प्राथमिक मशागत

Which type of tillage aims at soil conservation and higher production with good crop growth ?

(1) Stubble mulch tillage

(2) Zero tillage

(3) Minimum tillage

(4) Primary tillage

---

**145.** लोहाची कमतरता सर्वसाधारणपणे कोणत्या प्रकारच्या जमिनीत आढळते ?

(1) ॲसीडीक जमिनीत (2) कॅलकॅरीअस जमिनीत

(3) सलाईन जमिनीत (4) अलकलाईन जमिनीत

Deficiency of iron is common in which type of soils ?

(1) Acidic soils (2) Calcareous soils

(3) Saline soils (4) Alkaline soils

---

146. पृथ्वी व सूर्य यांच्यातील सरासरी अंतरावरील सूर्याचे पृथ्वीवरील प्रचरण सुमारे __________ असते.

(1) 470 $W/m^2$ (2) 770 $W/m^2$

(3) 1170 $W/m^2$ (4) 1370 $W/m^2$

The total solar irradiance at the mean Earth – Sun distance is found to be approximately __________ .

(1) 470 $W/m^2$ (2) 770 $W/m^2$

(3) 1170 $W/m^2$ (4) 1370 $W/m^2$

---

147. उपग्रहाच्या माध्यमातून पृथ्वीपृष्ठावरील एखाद्या गोष्टीची जागा, त्याची गती व वेळ याची नेमकी ***अचूक*** माहिती देणारी यंत्रणा म्हणजे.

(1) जी.आय.एस.

(2) जी.पी.एस.

(3) जी.एस.आय.

(4) वरीलपैकी कोणतीही नाही

What is the satellite based navigational aid providing accurate information regarding place, velocity and time of an object on the globe called ?

(1) GIS

(2) GPS

(3) GSI

(4) None of the above

---

148. प्रकाशामध्ये (दृश्य) __________ असतात.

(1) लघु लांबीच्या व उच्च वारंवारीता लहरी
(2) दीर्घ लांबीच्या व निम्न वारंवारीता लहरी
(3) लघु लांबीच्या व निम्न वारंवारीता लहरी
(4) दीर्घ लांबीच्या व उच्च वारंवारीता लहरी

Visible light has waves of

(1) shorter wavelength and high frequency
(2) longer wavelength and low frequency
(3) shorter wavelength and low frequency
(4) longer wavelength and high frequency

---

149. __________ हे सर्वोतम आणि व्यापारी दृष्टया सर्वाधिक वापरले जाणारे भौगोलिक माहिती प्रणालीतील प्रतिमा प्रक्रियण कार्यक्रम सामग्रीसंच आहे.

(1) इरदास (ERDAS) (2) मॅटलॅब (MATLAB)
(3) एक्सेल (EXCEL) (4) फोटोस्मार्ट (PHOTOSMART)

__________ is the best and largely used commercial image processing software package in GIS.

(1) ERDAS (2) MATLAB
(3) EXCEL (4) PHOTOSMART

---

150. __________ या छायाचित्रातून (कल्पनाचित्र) जमीन व पाणी यांच्या सीमा सुस्पष्ट होतात.

(1) कृष्णधवल
(2) इन्फ्रारेड
(3) क्ष-किरण
(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

Boundaries between land and water are distinguished perfectly in the ______ .

(1) Panchromatic photographs/imageries
(2) IR photographs/imageries
(3) X-ray photographs/imageries
(4) None of the above

---

# सूचना - (पृष्ठ 1 वरुन पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतः बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र.क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**